**।।सुविचार।।**

प्रत्येकाशी प्रेमाने वागलं पाहिजे. जे तुमच्याशी वाईट वागतात, त्यांच्याशीही प्रेमानच वागल पाहिजे,
**ते चांगले आहेत म्हणून नाही,**
**तर तुम्ही चांगले आहात म्हणून.**

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०५ एप्रिल २०२५







## दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची मुजोरी ! गर्भवती आईने गमावला जीव



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, पुणे :** पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनीशा भिसे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे प्रतिक्रिया दिली आहे.

हलगर्जीपणा करणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर शंभर टक्के कारवाई केली जाईल असं आश्वासन त्यांनी दिलं आहे. रुग्णालयात एक प्रकारची मुजोरी सुरू आहे. ही मुघलशाही आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी दखल घेतली आहे. गर्भवती तनीषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कुणालाही सोडलं जाणार नाही. अस स्पष्ट मत चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केलं आहे. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, रुग्णालयाकडून मोठी चूक झाली आहे. अशा चुकीला माफी नाही. सरकार यावर योग्य कारवाई करणार आहे. सर्वसामान्य माणसाला अशा पद्धतीने उपचार न देणे ही एक प्रकारची मुजोरी आहे. ही मुघलशाही आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी दखल घेतलेली आहे. आम्ही कुणालाही सोडणार नाहीत. कठोर कारवाई करणार आहोत. घटनेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे.

पुढे ते म्हणाले, जिल्ह्याधिकारी यांच्याशी बोललो आहे. रुग्णालयाला अनेक सोयी सुविधा दिल्या आहेत. आणखी एक जागा पार्किंगसाठी दिली आहे. परंतु, डॉक्टर आणि कर्मचारी अशी मुघलशाही करत असतील तर आम्ही मान्य करणार नाही. शक्य असेल तर गुन्हे दाखल करू. असं आश्वासन देतो अस ही त्यांनी अधोरेखित केले आहे.

मंत्री आशिष शेलार आणि काँग्रेस चे विजय वडवट्टीवर यांच्या भेटीवर म्हणाले, महाराष्ट्राची संस्कृती आहे. विरोधी आणि सत्ताधारी एकत्र भेटत. इतर राज्यासारख नाही. अनेकदा मला ही विजय वडवट्टीवार भेटले आहेत. आशिष शेलार यांना कामानिमित्त भेटले असतील. पुढे ते म्हणाले, ते पक्षांतर्गत बोलले नाहीत. पक्ष सोडणार आहे, मला पक्षात यायचं आहे. अस बोलले नाहीत. त्यांनी काँग्रेस च काम करण्याची भूमिका घेतलेली आहे.

पुढे ते म्हणाले, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई करण्यासाठी मर्यादा नाही. मंगेशकर परिवारावर थोडीच कारवाई आहे. चूक करणाऱ्यांवर कारवाई करत आहोत. ते कशाला आडवे येतील. असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. पुढे ते म्हणाले, मनसेच्या आंदोलनकर्त्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण करू नये. चुकलं असेल तर त्यांना काढता येतं, कारवाई करता येते. त्यांनी हातात कायदा घेऊन नये. पुढे ते म्हणाले, संजय राऊत यांना मोदींच्या नावाचा, भाजपच्या नावाचा, देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा पंडू रोग झाला आहे. पंडु रोग म्हणजे माणसाचं स्वास्थ्य खराब करत म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिसतात. असा खोचक टोला संजय राऊत यांना लगावला आहे.

## थोडक्यात

### ट्रॅक्टर ट्रॉली विहिरीत पडल्याने दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांचे अर्थसाहाय्य



**दि.०४, मुंबई :** नांदेड जिल्ह्यातील आसेगाव येथे आज सकाळी ११ महिला मजुरांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर ट्रॉली विहिरीत पडून झालेल्या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपयांचे अर्थसाहाय्य जाहीर करण्यात आले आहे. अपघातात काही महिलांचा मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी आहे, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी श्रध्दांजली अर्पण करत, त्यांच्या कुटुंबियांप्रति संवेदना व्यक्त केली आहे. हिंगोली जिल्ह्यातील गुंजगाव येथील या महिला होत्या आणि शेतिकामासाठी त्या जात होत्या.

त्या विहिरीतून महिलांना बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक यासह संपूर्ण यंत्रणा घटनास्थळी आहे. तीन महिलांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. हिंगोली आणि नांदेड दोन्ही प्रशासनाच्या संपर्कात असल्याची माहिती मुख्यमंत्र्यानी दिली आहे.

### पत्रकार विनोद वास्कर हल्ला प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांना निवेदन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, ठाणे :** अक्षराज मीडियाचे कल्याण ग्रामीण विधानसभा चे अधिकृत व प्रामाणिक प्रतिनिधी विनोद वास्कर यांना दि.२८ मार्च २०२५ रोजी दुपारच्या सुमारास शिळ चौकात राहुल काटे आणि जितू आलिमकर या गावगुंडाकडून मारहाण करण्यात आली होती. याप्रकरणी भारतीय जनता पार्टीचे कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन वसंत डावखरे यांनी २ एप्रिल २०२५ रोजी विनोद वास्कर यांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली. कुटुंबासोबत आणि ग्रामस्थ सोबत चर्चा केली. आम्ही तुमच्या सोबत आहे तुम्हाला न्याय देऊ असे आश्वासन वास्कर कुटुंबाला दिले. त्यानंतर दिनांक ३ एप्रिल २०२५ रोजी आमदार निरंजन वसंत डावखरे, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष साहिल बाळाराम पाटील, आणि शिळ ग्रामस्थ शिस्त मंडळ यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांना लेखी निवेदन देऊन आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची करण्याची मागणी केली. विनोद वास्कर भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी असल्यामुळे स्वतः आमदार निरंजन डावखरे या प्रकरणाकडे लक्ष घालत आहे. विनोद वास्कर हे गावासाठी लढा देत आहे. बेकायदेशीरपणे खोटे व बोगस कागदपत्रे तयार करून विक्री केलेल्या जमीन संदर्भात बातमी विनोद वास्कर यांनी अक्षराज मीडियावर सुद्धा लावली होती. याच गोष्टीचा राग मनात धरून सदर आरोपींनी वास्कर यांना भर चौकात जीवे मारण्याचा प्रयत्न केला. पत्रकारावर झालेल्या हल्ल्याचा निषेध पत्रकार बांधव व ग्रामस्थ करत आहे. तसेच याप्रकरणी निर्भय पत्रकार संघटनेच्या सर्व सदस्यांनी ठाणे पोलीस आयुक्त यांना निवेदन दिले आहे. यावेळी ठाणे, भिवंडी, मुंब्रा, कळवा, नवी मुंबई, पालघर, कल्याण, डोंबिवली, दिवा, अंबरनाथ या सर्व भागातून पत्रकार निवेदन देण्यासाठी आले होते. दोन दिवसात आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हे दाखल झाले नाहीतर निर्भय पत्रकार संघटनेतर्फे शिळ डायघर पोलीस स्टेशन येथे ठिय्या आंदोलन छेडले जाईल असे लेखी पत्रात संघटनेने लिहून दिले आहे. तरी विनोद वास्कर यांना न्याय देण्यात पोलीस प्रशासन कितपत सहकार्याची भूमिका बजावते, याकडे शिळ ग्रामस्थ व सर्व पत्रकारांचे लक्ष लागले आहे.

## चित्रपट प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रूजवणारा कलाकार वयाच्या ८७ व्या वर्षी हरपला..



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी रोजी झाला होता. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी स्वामी असे होते.

मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचाच प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद या चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. हा चित्रपट खूप गाजला.या चित्रपटात त्यांनी साकारलेली भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली.

देशभक्तीवर आधारित हा चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले.

लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान किसान हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट खूप गाजला या चित्रपटातील गाणी लोकप्रिय झाली. मेरे देश की धरती हे अजरामर गीत याच चित्रपटातले. उपकार नंतर त्यांनी पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद मे असे देशभक्तीपर चित्रपट काढले हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी आणि अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारत कुमार' हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट त्याकाळी खूप गाजले होते.

मेरे देश की धरती, सरफरोशी की तमन्ना, एक प्यार का नगमा है, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा.. अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप लोकप्रिय ठरले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. १९९२ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले.

मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा पडद्यावरील भारत कुमार काळाच्या पडद्याआड हरपला गेला असे म्हणावे लागेल. मनोज कुमार यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

## अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अवकाळीचा दणका !

### सर्वाधिक नुकसान संगमनेरमध्ये ; कृषी विभागाचा प्राथमिक अहवाल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** गेल्या दोन दिवसापासून नगर जिल्ह्याच्या विविध भागात अवकाळी पावसासह गारपिटीचा तडाखा बसत आहे. यामुळे ऐन उन्हाळ्यात अनेक ठिकाणी दमदार पाऊस बसत असून अनेक ठिकाणी शेतातील उभ्या पिकात पाण्याचे तळे साचले आहे. तर अनेक ठिकाणी भर उन्हाळ्यात रस्त्यावरून खळखळून पाणी वाहतांना दिसत आहे.

जिल्ह्यात कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार २ एप्रिलला ५ तालुक्यांतील ३९ गावांतील २ हजार २२ शेतकर्यांना अवकळीचा फटका बसला असून या शेतकर्यांची ८९२.३५ हेक्टरवरील विविध पिकांचे नुकसान झाले आहे. दरम्यान गुरुवारी (दि.३) रोजी दुपारी चार पासूनच नगर शहरासह दक्षिण जिल्ह्यातील काही तालुक्यांत पुन्हा वादळी वार्यासह जोरदार पाऊस बरसला असून यामुळे शेतकर्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे समोर आले आहे. कृषी विभागाच्यावतीने वादळी वार्यासह झालेल्या गारपिटीच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. कृषी व महसूल विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार जिल्ह्यात संगमनेर, पारनेर, कर्जत, नगर आणि अकोले तालुक्यातील ३९ गावांतील २ हजार २२ शेतकर्यांना या अवकाळीचा फटका बसला आहे. यात १३८.९० हेक्टरवरील ३२७ शेतकर्यांचे ३३ टक्क्यांच्या आत तर १ हजार ६९५ शेतकर्यांचे ७५३.४५ हेक्टरवरील पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेले आहे. गुरूवारी दुपारी ते रात्री उशीरापर्यंत पावसाळ्याप्रमाणे अनेक ठिकाणी ढगांचा गडगडात आणि विजेचा लखलखाट सुरू होता. अनेक ठिकाणी जोरदार वार्यासह पावसाच्या सरी कोसळ्या. नगर शहर आणि एमआयडीसी भागात पावसाच्या सरी कोसळ्या. या अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता.

**पारनेर तालुक्यात कांदा पिकाचे नुकसान !**

पारनेर तालुक्यात बुधवारी आणि गुरूवारी सलग दोन दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, कांदा, गहू, वाटाणा, टोमॅटो पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणात उन्हाळी कांदा पिकाची काढणी सुरू होती. शेतात उघड्यावर असणाऱ्या कांदा पिकाला अवकाळी गारपिटीचा फटका बसला आहे.



**तालुकानिहाय झालेला पाऊस !**

नगर -१.३, पारनेर - ७, श्रीगोंदा - १.१, कर्जत - ११.७, जामखेड - १.२, शेवगाव -०.१, राहुरी - ०.१, संगमनेर १.४, अकोले ४ तर पाथर्डी, कोपरगाव, श्रीरामपूर, राहाता या तालुक्यात अवकाळी पाऊस झाला नाही.

# संपादकीय



## राजेशाही आपुली...

जगातील अनेक देशांत लोकशाही हवी या मागणीसाठी आंदोलन करणारे नागरिक पाहणे नवीन नाही. पण नेपाळचे पाऊल मात्र उफराटे. या देशात आंदोलन सुरू आहे ते मोडीत निघालेली राजेशाही पुन्हा प्रस्थापित केली जावी या मागणीसाठी. त्या देशातील राजेशाही संपुष्टात आली त्यास दीड दशकाहून अधिक काळ लोटला. या काळात डझनांनी सरकार-बदल झाले. कारण राजकीय स्थैर्य नाही. एकदा डावे सत्तेवर येतात. नेपाळ कम्युनिस्ट पार्टी, त्याच बाजूचे माओवादी हे नेपाळमध्ये सरकार बनवतात. पण त्यांचे काही चालत नाही. ते सरकार जाते. मग नेपाळ काँग्रेस पक्ष, राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी वगैरेंचे सरकार येते. त्यांचीही तीच बोंब. सरकार म्हणजे जणू खोखोचा खेळ. तेही टिकत नाहीत. यामुळे नेपाळी जनता त्रस्त झाली असून हा पोरखेळ आता पुरे असे अनेकांस वाटू लागले आहे. अशा वातावरणात त्या देशातील राजघराण्याच्या प्रतिनिधीने फेब्रुवारी महिन्यात मोर्चा काढला आणि राजकीय अस्थिरतेविरोधात आवाज उठवता उठवता जनतेस आपल्यामागे येण्याचे आवाहन केले. जनता खरोखरच आली. त्यामुळे तेव्हापासून पुन्हा एकदा राजेशाहीच हवी अशी मागणी जोर धरू लागली आणि आता तर त्या मागणीसाठीच्या आंदोलनास हिंसक वळण लागले. निदर्शकांनी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले, जाळपोळीच्या घटना घडल्या आणि राजकीय कार्यालयांवर हल्लेही झाले. त्यानंतर पंतप्रधान के. पी. ओली यांनी नागरिकांस शांततेचे आवाहन केले आणि वर कारवाईचा इशाराही दिला. तथापि त्याने काही फरक पडेल असे वाटत नाही. नागरिकांतील ही अस्वस्थता नेपाळपुरती मर्यादित नाही. आपल्या आसपासच्या देशांवर नजर टाकल्यास कमी-अधिक प्रमाणात हीच परिस्थिती सर्वत्र दिसेल. तेव्हा यानिमित्ताने या परिस्थितीमागील कारणांवर भाष्य करता करता 'गड्या आपुला राजाच बरा' असे नागरिकांस का वाटू लागते याचा शोध घेणे आवश्यक. बांगलादेश, पाकिस्तान, काही प्रमाणात श्रीलंका, म्यानमार अशा आपल्या शेजारी देशांतील अस्वस्थता आणि नेपाळातील परिस्थिती यामागील कारणे फार भिन्न नाहीत. या सर्व देशांत कोणत्या ना कोणत्या कारणांनी अस्वस्थता आहे आणि आंदोलनेही सुरू आहेत. हे देश आपल्याप्रमाणे एके काळच्या ब्रिटिश साम्राज्याचा भाग होते. दुसऱ्या महायुद्धानंतर ग्रेट ब्रिटनला अवकळा आली आणि साम्राज्याचा हा डोलारा सांभाळणे त्यांना झेपेनासे झाले. परिणामी हे देश 'स्वतंत्र' झाले. त्यांना स्वनिर्णयाचा अधिकार मिळाला. पण त्यापैकी एकाही देशात आज निर्भेळ नागरिककेंद्री लोकशाही नाही. याचे कारण या देशांस लोकशाहीची आस नाही, असे नाही. तर या देशांतील नागरिकांत सरंजामी मानसिकताच अजूनही आढळते. राजा हा देव, राजा हा देवाचा प्रतिनिधी, राजा सर्वश्रेष्ठ इत्यादी भाकडकथा या देशांतील नागरिक अजूनही चघळत असतात. लोकशाही रचनेसाठी जी एक नागरिकांची परिपक्व मानसिकता लागते ती या देशांतील नागरिकांत अजूनही पुरेशी नाही. कायद्यासमोर सर्व समान हे वरकरणी साधे तत्त्व. त्यात लोकशाहीचा प्राण असतो. पण या तत्त्वाची प्राणप्रतिष्ठाच या देशांत होऊ शकली नाही. 'कायद्यासमोर सारे समान; पण काही अधिक समान' या ऑर्वेलियन वचनावर या देशांत सर्रास श्रद्धा दिसून येते. मग ते केवळ अर्थशास्त्राचे नोबेल मिळाले म्हणून देशाचे सुकाणू महंमद युनूस यांच्या हाती देणारा बांगलादेश असो की धर्मवादात प्रगतीचा आसरा पाहणारा पाकिस्तान असो वा लष्करशाहीखाली चेपला गेलेला म्यानमार असो. नागरिकांच्या विचारकेंद्रांत प्रबुद्ध लोकशाहीची मशागत झाली नाही तर काय होऊ शकते याची ही सर्व उदाहरणे. त्यांची दखल घेताना काही निरीक्षणे सूचक ठरतात. पहिले म्हणजे खऱ्या लोकशाहीचे मूर्तिमंत उदाहरण असणाऱ्या अमेरिकेतच जर लोकशाहीच्या चिंध्या होत असतील आणि तेथील नागरिक हे वास्तव हतबुद्ध होऊन पाहत बसले असतील तर अन्य देशांस लोकशाही आश्वासक कशी काय वाटेल, हा प्रश्न. अमेरिकेत लोकशाही प्रक्रियेतून सत्तेवर आलेल्या ट्रम्प यांचे वर्तन पाहता लवकरच त्यांनी अश्वमेध यज्ञाची घोषणा केल्यास आश्चर्य वाटू नये. अनभिषिक्त सम्राटच जणू ते! कधी कोणता आदेश देतील आणि कधी कोणता दिलेला आदेश मागे घेतील याची हमी नाही. अशा वेळी लोकशाही खोलवर रुजलेल्या अमेरिकेसारख्या देशातच लोकशाही बागबूग करत असेल तर जेथे ती मुळातच स्थिर नाही; अशा देशांतील लोकशाहीचा कसा भरवसा धरणार? तसेच लोकशाहीच्या गळ्यास नख अमेरिकेतच लागते आहे असे नाही. लोकशाहीच्या नावे आणाभाका घेणाऱ्या अन्य अनेक देशांतील लोकशाहीदेखील किती दोलायमान आहे याचे अनेक दाखले कोणीही सहज देईल. अमेरिकेतही २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकांत लोकशाहीचा सर्वाधिक फायदा निवडक मूठभरांना होतो असा प्रचार झाला आणि तो करणारे डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी पहिल्यांदा निवडून आले. म्हणजे मतदानाद्वारे नागरिकांनी आपला अर्थकारणावरचा राग राजकारणावर काढला, असा त्याचा अर्थ. तथापि ट्रम्प यांच्यामुळे अर्थव्यवस्था फार उजळू लागली असे झालेले नाही. आता तर दुसऱ्या खेपेस ट्रम्प यांची अमेरिकाही कुडमुड्या भांडवलशाहीसम वागू लागलेली आहे. या अशा कुडमुड्या भांडवलशाहीत सरसकटपणे सर्व उद्योगांचे भले होत नाही. तर मूठभरांच्या ताटातच सर्व काही पडते. याचा अर्थ लोकशाही प्रामाणिकपणे, सर्व नागरिक समभाव दर्शवत राबवली गेली नाही तर नागरिकांचा या व्यवस्थेवरचा विश्वास उडू लागतो. अमेरिकेत तेच होताना दिसते.

# जिवंत जमीन...

**नमस्कार, शेतकरी बंधुनो,**

शेतजमिनीतून मोठ्या प्रमाणात उत्पन्न घ्यायचे असेल तर जमिनी जिवंत असल्या पाहिजे, म्हणजे जमिनीत जास्त प्रमाणात जिवाणू असले पाहिजे. १ मूठ भर मातीत करोडो जिवाणू असतात, आणि या जिवाणू मुळेच आपल्याला उत्पन्न मिळते, पण गेल्या ५० वर्षांपासून रासायनिक खतांचा आपण इतका वापर केला की ह्या जिवाणूंची संख्या आपण १० टक्क्यांवर आणून ठेवली आहे, असाच रासायनिक खतांचा सातत्याने वापर केला तर शेत जमिनी बंजर, क्षारपड, खारट, नापीक,होतील.पुढे काही दिवसांनी अशा जमिनीत तणही उगवणार नाही.आपण कितीही रासायनिक खतांचा वापर केला तर ती खते जशीच्या तशी पिके ग्रहण करीत नाहीत तर त्या खतांवर प्रक्रिया करून पिकाना उपलब्ध करून देण्यासाठी जमिनीत मोठ्या प्रमाणावर जिवाणू असले पाहिजे, तरच जमिनीची उत्पादकता वाढेल.



रासायनिक खते हे जिवाणूंचे खाद्य नाही, जिवाणूंचे खाद्य आहे जमिनीतील सेंद्रिय कर्ब.जमिनीत असलेल्या सर्व प्रकारच्या कास्ट पदार्थांपासून हुमस तयार होतो, हुमस पासून सेंद्रिय कर्ब तयार होतो व हा सेंद्रिय कर्ब म्हणजे जिवाणूंचे खाद्य असतो, आपण जमिनीत टाकलेल्या खतांवर हे जिवाणू जैविक, भौतिक रासायनिक क्रिया घडवून आणतात व ते पिकाला ग्रहण करण्या योग्य करण्याचे काम करतात, आपल्या जमिनीत असे काम हे जिवाणू अहोरात्र करीत असतात ज्या जमिनीत जीवसृष्टी जास्त असते अशा जमिनीचा सेंद्रिय कर्ब ही जास्त असतो, रासायनिक खतांचा भडिमार करून आपण आपल्या जमिनीचा सेंद्रिय कर्ब खूप कमी करून टाकलेला आहे.आणि म्हणून उत्तरोत्तर आपले उत्पन्न कमी कमी होत आहे. म्हणून आपण जमिनीच्या आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे, जमिनीचे आरोग्य सुधारल्या शिवाय, जमीन आपल्याला मोठ्या प्रमाणात उत्पन्न देऊ शकणार नाही.जमिनीची उत्पादकता वाढविण्या साठी रासायनिक खतांचा वापर ५० वर आणून, सेंद्रिय, व जैविक खतांचा वापर वाढवला पाहिजे. त्यासाठी शेणखत, गांडूळ खत, व्हर्मीवॉश, कंपोस्ट खत, ह्युमेंट, बाजारात मिळणारे चांगल्या प्रतीचे सेंद्रिय खत, पाझर तलावांचा गाळ, हरळीची खते, प्राण्यांचे मलमूत्र इत्यादी चा वापर केला पाहिजे.

जैविक खतात नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू, स्फुरद विरघडवणारे जिवाणू, पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू, इफ्फेक्टिव्ह मायक्रो ऑर्गग्रीझम (मेपल इ.एम जिवाणू), गांडूळ इत्यादी, यांचा वापर आपण केला पाहिजे तरच जमिनीची उत्पादकता वाढेल.

थोडक्यात म्हणजे जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवा, जिवाणूंची संख्या वाढवा उत्पन्नात आपोआप वाढ होईल. पीक हे सजीव आहे त्यालाही सर्व प्रकारच्या अन्न घटकांची आवश्यकता असते. कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन, क्लोरीन याबरोबरच मुख्य अन्न द्रव्य दुयम व सूक्ष्म अन्न द्रव्ये आपण संतुलित प्रमाणात जमिनीला पुरवली पाहिजे, योग्य वेळी योग्य त्या त्या खतांचा वापर करून पिकाची प्रतिकार क्षमता वाढवली पाहिजे, पिकाची प्रतिकार क्षमता वाढली तर त्यावर रोगही कमी पडतात कीड नाशकेही कमी लागतात व उत्पन्नातही वाढ होते. या व्यतिरिक्त वरील सर्व खतांचा पिकांना उपयोग होण्यासाठी ती खते पिकांना ग्रहण योग्य बनवण्यासाठी वर सांगितलेल्या सर्व जैविक खतांचा वापर अनिवार्य आहे, तरच शेतजमिनी पासून आपण मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेऊ शकू.

**धन्यवाद....**

**श्री.शिंदे सर**
**९८२२३०८२५२**

## नागझरी चाळ येथे महापालिकेची तोडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, पनवेल :** महापालिका उपविभाग नावडे हद्दीतील नागझरी चाळ येथील अनधिकृत रित्या बांधलेल्या गोडाऊनवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार जेसीबी व पोखलँडच्या माध्यमातून तोडक कारवाई करण्यात आली.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त रविकिरण घोडके, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, प्रभारी अधिक्षक सर्वश्री अमर पाटील, जितेंद्र मढवी तसेच एमएसएफ चे जवान, पोलीस अधिकारी, कर्मचारी अतिक्रमण पथक सदर कारवाईस उपस्थित होते.

महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत शेड अथवा बांधकाम केले असता ते तात्काळ काढून टाकावे अन्यथा महापालिकेच्यावतीने त्यावरती तोडक कारवाई करण्योत येईल. तसेच कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेची रीतसर परवानगी घ्यावी. विनापरवानगी केलेले बांधकाम हे अनधिकृत मानले जाऊन त्यावरत तोडक कारवाई करण्यात येईल.

## स्टेज..

बॅक स्टेज कर्मचारी
जे नाटक तमाशात
पडद्या मागे कार्यरत
कर्तव्य पूर्ती जोशात

नावत्यांचे माहीत न
राहे कायमअंधारात
नायकनायिका मात्र
प्रसिद्धपावे रातोरात

व्हिलनसुध्दा आवडे
कलाकार प्रकाशात
दिग्दर्शकनिर्माते पण
झळकले आकाशात

पडद्या मागचे केवळ
कायमतिष्ठत कोशात
चारदमडे मुश्कीलीने
तया पडतात कोषात

नामो निशाणी त्यांची
कधी पाही नकाशात
जयजयकार इतरांचा
नाद घुमे दश दिशात

मागेलं तेवढी बिदागी
इतरजणांच्याखिशात
नाचवतात बोटावरती
मागणी करी त्वेशात

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचल बातमी

# अजूनही वेळ गेलेली नाही......!

मनुष्य हा चुकीचा पुतळा आहे. मनुष्याच्या हातून चुका ह्या घडतातच आणि घडणे स्वाभाविक आहे.कारण भौतिक आकर्षण, सामाजिक परिस्थिती, संगत यामुळे जीवनावर चांगले वाईट परिणाम होतात. एका विशिष्ट वयात आल्यानंतर तरुण-तरुणी हुल्लडपणात चुका करतात.विशेषतः मुले ही बाहेरगावी शिकण्यासाठी जातात. भौतिक वातावरण व आकर्षणाचे जग यामुळे मूळ सुसंस्कार विसरतात. मित्राच्या संगतीने वयाच्या अठराव्या ते बावीस-पंचवीसाव्या वर्षी गुटखा, पुड्या तंबाखू खाऊन बघतात.कधीकधी मद्यप्राशनही करून बघतात. मित्रांसोबत कधी आनंदाच्या भरात तर कधी अनपेक्षित घडलेल्या घटना जसे की, परीक्षेतील अपयश, प्रेमप्रकरण अश्या या नैराश्या तून मद्यप्राशन करतात.अन हळूहळू त्याचे रूपांतर व्यसनामध्ये होते. तो बेचैन होऊ लागतो व कळत-नकळत संस्कारीत मुले सुद्धा अश्या या वाईट गोष्टींच्या बळी पडतात. आयुष्याचं नुकसान करून घेतात. या व्यसनातून पुढे शालेय, महाविद्यालयीन स्तरावर अपयश येऊन बेरोजगार होतात. काहींना रोजगार उपलब्ध होऊन सुद्धा काही सवयी मात्र सुटत नाही. त्या तशाच कायम राहतात. लग्न होते.संसारही चालू होतो. कधी-कधी हुशार संस्कारी मुलांना हे नकोसे वाटते. आपण जे काही करतोय ते चुकीचे आहे,असे वाटते. त्यातून स्वतःचे नुकसान होत आहे.याची जाणीवही होते. एकांतात रडतात. मित्रांजवळ बोलूनहीं दाखवतात. वरिष्ठ मित्रमंडळी यांच्याकडे मनातील भावना व्यक्त करतात. सुरुवातीपासूनच्या गोष्टी सांगतात जीवनाला. जीवनाला असे वळण का भेटले?याचे चांगले वाईट परिणाम ही त्यांच्या लक्षात येते. हे त्यांना समजते परंतु,तोपर्यंत ते पूर्णतः व्यसनाधीन झालेले असतात.ते तंबाखू- गुटखा खात नाही तर, तंबाखू-गुटखा त्यांना खाऊ लागतो. ते दारू पीत नाही तर,दारू हळूहळू त्यांना पिऊ लागते. शरीराची व्यसन करण्याची तयारी नसली तरी, मन मात्र ऐकत नाही ते पायांना दुकानाकडे घेऊन जातेच. शेवटी तो व्यसन करतोच, परंतु



मित्रांनो,भावांनो तुमचे स्वतःचे जीवन स्वतःच सुधारू शकता. मनाला घट्ट करा. कधी-कधी मन म्हणेल तेच करू नका. मनाच्या विरुद्धही वागून बघा.व्यसनाच्या बाबतीत....!

आपल्या आवडीचे जे काही काम आहे. ते करायला सुरुवात करा. त्यामध्ये मन गुंतवा. जो छंद असेल तो जोपासा. म्हणतात की, प्रत्येक मनुष्याच्या अंगी एक तरी कला दडलेली असते, म्हणून प्रत्येक मनुष्य हा एक कलाकार असतो.एखादा पक्षांचे छान आवाज काढतो. एखादा आवाजाची मिमिक्री करतो. एखादा छान सुरात गायन करतो तर कुणी छान चित्र काढतो. काहि फारसे शिकलेले नसले तरी, शेतीचे काम उत्तम प्रकारे करतात. छोटे-मोठे उद्योग करतात. भाजीपाला,फळ विकणे. एवढेच नाही तर,झाड-लोड करणे असे काम करू शकतात. त्यातून कामात मन लावून वेळ निघून जाऊ शकतो. आणि व्यसनाकडील मन दुसरीकडे वळवू शकतो म्हणून, हि छोटी-मोठी कार्य करायला सुरुवात करा. त्यासाठी मुहूर्ताची आवश्यकता नसते म्हणून, त्वरित कामाला लागा.संत कबीर म्हणतात, कल करे सो आज कर । आज करे सो अब ।। अर्थात मनाचा निश्चय करायचा आहे. आज मला मुळीच व्यसन करायचे नाही. मला जे आवडते ते मी करणार. त्यात माझे हित आहे. ज्यातून माझे शारीरिक, मानसिक, आर्थिक नुकसान होणार नाही, असे कार्याची मी सुरुवात करणार आहे त्याचबरोबर सर्वप्रथम ज्या ठिकाणी मनाला शांती भेटेल.ते करायचे आहे. शांती उन्नति का मार्ग हैं । याप्रमाणे मनाला शांत करायचे आहे. शक्य झाल्या स ध्यानधारणा करायची आहे.यातून चंचल मन स्थिर होईल. स्थिर झालेल्या मनाला तुम्हाला कामाला लावायचे आहे. तुमच्या मर्जीप्रमाणे.....! आणि तेही सत्कर्मा कडे कारण, वाईट विचार सोडून तुम्हांला सत्कार्याबद्दल सतत विचार व चिंतन तुम्हांला करायचे आहे. तुमच्या आवडीप्रमाणे...!

सत्कार्य, छंद यामुळे मन गुंतायला लागले की, मनाला तुमच्या ताब्यात घ्या. तुमच्या अधिन करा. एकदा का मन तुमच्या अधीन झाले की,मनाला कामाला लावा. त्यांच्याकडून सत्कार्य करून घ्या. हीच सुवर्णसंधी आहे कारण, मन तुमच्या अधिन नव्हते तेव्हा एवढे दिवस तुम्ही त्याचे ऐकले. आता तुमचे त्याला ऐकावं लागणार आहे. व्यसन न करता त्याच पैशातील एखादी खेळणी तुमच्या मुलांसाठी घरी घेऊन जायची आहे. पत्नीसाठी छान भेटवस्तू घेऊन जायची आहे.बघा! तुमची मुलं तुम्हांला कितीतरी वेळ सोडणार नाही. तुमच्या अंगा-खांद्यावर खेळतील. बाबा! बाबा! म्हणून गळ्यात पडतील.पत्नी सुद्धा प्रेमाने बोलेल. यातून तुम्हांला वेगळे समाधान आणि एक विलक्षण आनंदनिर्मिती होईल. अश्या या लाड प्रेमात मन गुंतायला लागले की,मग दुसरीकडे मन गुंतवायचे कामच नाही कारण, लेकरांसोबत आणि कुटुंबासोबत तुमचा वेळ निघून जाईल.तो कळणार सुद्धा नाही.कधीकाळी व्यसनाने उद्विग्न,निरस झालेलं मन आता प्रसन्न राहील. यातून तुमचे आर्थिक,मानसिक,शारीरिक नुकसान तर होणार नाहीच परंतु, जीवन जगण्याचा आनंद सुद्धा मिळेल.

मित्रांनो ! आजच मनाशी घट्ट निर्धार करा. जीवनात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करा. व्यसन करू नका. आपले छंद जोपासा. सत्कार्यात मन गुंतवा. मन मारून नाही तर, मन भरून जगा आयुष्य खूप सुंदर आहे. वाईट गोष्टीचा त्याग करा.चांगल्या गोष्टीची कास धरा.अजूनही वेळ गेलेले नाही....!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रूजवणारा कलाकार

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचाच प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद या चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटात त्यांनी साकारलेली भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली. देशभक्तीवर आधारित हा चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान किसान... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट खूप गाजला या चित्रपटातील गाणी लोकप्रिय झाली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गीत याच चित्रपटातले. उपकार नंतर त्यांनी पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद मे हे देशभक्तीपर चित्रपट काढले हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी आणि अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारत कुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट त्याकाळी खूप गाजले होते. मेरे देश की धरती, सरफरोशी की तमन्ना, एक प्यार का नगमा है, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप लोकप्रिय ठरले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. १९९२ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा पडद्यावरील भारत कुमार काळाच्या पडद्याआड गेला असे म्हणावे लागेल. मनोज कुमार यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार (दौंड जिल्हा पुणे)**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

## थोडक्यात

# राज्यकर्त्यांचे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील मंचर आगाराकडे दुर्लक्ष



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मंचर (पुणे) :** बस वाटपामध्ये आंबेगाव तालुक्यातील मंचर आगारावर महाराष्ट्र शासनाकडून वारंवार अन्याय होत आहे. वाट पाहीन पण एस.टी नेच जाईन असं ब्रीदवाक्य सांगणारी एस.टी ज्यावेळी एक तास नाही, २ तास नाही, ४ तास नाही तर चार-चार दिवस वाट पाहायला लावत आहे. महाराष्ट्र शासनाच्या परिवहन खात्यातून आंबेगाव तालुक्यावर अन्याय होत असून, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि महाराष्ट्र शासन यांनी नवीन अडीच हजार बसेस तयार केल्या. परंतु आंबेगाव तालुक्यात एकही बस आली नाही. सर्व बसेसचे इतरत्र आगारांमध्ये वाटप झाले. आंबेगाव तालुक्यातील मंचर एसटी डेपो चालू होऊन तीन वर्षे झाली.परंतु डेपो चालू झाल्यापासून तालुक्यातील एसटी सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. मंचर डेपोला पुरेसे गाड्या नसल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, नोकरदार वर्ग, कॉलेजची मुले/मुली दुर्गम भागातील नागरिक १२ ज्योतिर्लिंगापैकी भीमाशंकर यास तालुक्यातील भाविक यांचे अतोनात हो हाल होत आहे. डेपोमध्ये कुठल्याही सुविधांची सोय नाही. सहकार मंत्री दिलीपरावजी वळसे पाटील व म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी लक्ष घालून तालुक्यातील सर्व गावांची एसटी सेवा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करावे आणि तालुक्यातील जनतेला न्याय द्यावा. महाराष्ट्र शासनाने कमीत कमी तालुक्याला नवीन २५ बसेस देण्यात याव्यात. नाहीतर पुढील काळात हुतात्मा बाबू गेणु युवा प्रतिष्ठान येत्या १५ दिवसात तीव्र आंदोलन करेल.

अशी माहीती हुतात्मा बाबू गेनु युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी निवेदन रुपी दिली आहे. यावेळी अनेक प्रवासी उपस्थित होते.श्री.साईनाथ तोत्रे,अजय आवटे,श्री. आनंद शिशुपाल, रामदास पडवळ यावेळी मंचर एसटी आगराचे प्रमुख बालाजी सूर्यवंशी, एसटी कर्मचारी रामभाऊ गेंगजे, संदीप पडवळ, गजानन बगाड, अंकुश कोरके, किसन शिंदे, शंकर काळे , सुनील माने यावेळी सर्वांनी आपल्या तीव्र भावना दोन्ही नेत्यांकडे मांडल्या आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस युवती अध्यक्षा यांच्या जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०४, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर नगर विधानसभा आमदार माननीय काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या व युवतीच्या समस्येसाठी दर शुक्रवारी महिला अध्यक्ष सुषमा रावडे तसेच युवती अध्यक्ष अपर्णा खामकर यांच्या नेतृत्व खाली जनता दरबार आयोजित करण्यात आला आहे. त्यामध्ये महिलांची प्रश्न समजुन घेतले जातात. त्यावर निर्णय घेऊन तो प्रश्न सोडवला जातो . संजय गांधी निराधार योजनेचे केवायसी करण्यात अडचण येत होती. तो प्रश्न तिथे सोडवण्यात आला. तसेच लाडकी बहीण योजनेमध्ये अजून काही महिला सहभागी झाल्या नाहीत त्यांना सहभागी होण्यासाठी प्रतिसाद दिला. महिलांचे प्रश्न हे अनेक असतात परंतु ते प्रश्न कुठे मांडायचे हे महिलांना माहीत नव्हते. ते प्रश्न आता महिला जनता दरबारामध्ये मांडता येतात.

# ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभाग कर्मचाऱ्यांचा सातव्या वेतनाचा प्रश्न मार्गी



**अक्षराज तानाजी ताकतोडे**

**दि.०३, ठाणे :** ठाणे महापालिकेतील आरोग्य विभागाअंतर्गत येणाऱ्या आधिपरिचारिका या पदावर कार्य करणाऱ्या कर्मचारी वर्गाच्या अडचणी जाणून घेत. याबाबत संबंधित विभाग आणि मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करून त्यांच्या समस्या मार्गी लावल्या. कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा फरक मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांनी नुकताच विशेष समारंभ आयोजित करून आमदार संजय केळकर यांचा हृदय सत्कार केला. तसेच व्हिडिओ कॉलद्वारे कर्मचाऱ्यांनी संपर्क साधून सातव्या वेतनाचा फरक मिळवून दिल्याबद्दल आभार ही मानले. यावेळी कामगार नेते सुधाकर शिंदे, संतोष लटपटे, वनिता हांडे, निलिमा तांबट, शैला नाईक, सिस्टर धुरी सिस्टर, अजित मोरे आदी कर्मचारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

# आ.अडबाले यांचे मनपा आयुक्तांना निर्देश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त झालेल्या व मृत्यू पावलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासन निर्णयानुसार सेवेत सामावून घेण्याचे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी महानगरपालिका आयुक्तांना दिले. अनुकंपा धारक व लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांच्या प्रलंबित प्रकरणांबाबत आ. सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने नुकतीच स्थायी समिती सभागृहात दुपारी बैठक पार पडली. चंद्रपूर शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध १३ फेब्रुवारी २०२३ रोजी मंजूर झालेला असून सफाई कामगारांची ४६२ पदे मंजूर आहे. मंजूर पदांपैकी सद्यस्थितीत ३१७ सफाई कामगार कार्यरत असून १४२ पदे रिक्त आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक १३ ऑक्टोंबर २०२४ अन्वये शासन निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ मधिल विहित केलेल्या तरतूदी दिनांक १२/०८/१९७५ ते २३/०२/२०२३ या कालावधीतील सर्व प्रलंबित प्रकरणांना लागू असल्याने चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे वारसांचे अर्ज मागविण्यात आले. यात सद्यस्थितीत अनुसूचित जातीचे ५०८ तसेच इतर प्रवर्गातील ९५ अर्ज असे एकूण ६०३ अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सर्व अर्जाची छाननी करून सेवाज्येष्ठतेनुसार यादी प्रकाशित करण्यात यावी. त्यावर हरकती मागवून १३ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार मनपा सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करावी. सदर शासन निर्णयानंतर नोकरी दिलेल्या वारसांची तपासणी करावी, अशा सूचना आमदार अडबाले यांनी दिल्या. यावर मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांनी ही सर्व प्रक्रिया पार पाडण्यासाठी ९० दिवसांचा अवधी मागितला. सदर वारसांना शैक्षणिक पात्रतेनुसार क वर्गात रिक्त पदी नोकरीत सामावून घेण्यात यावे. अर्ज ६०३ आणि रिक्त पदे १४२ असल्याने वाढीव पदांना पदभरतीबाबत शासनाकडे मागणी करावी, अशा सूचना देखील आमदार अडबाले यांनी आयुक्तांना दिल्या.

# कारागृहात मिळतेय गीतेतून जीवन जगण्याची नवी दृष्टी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** क्रोध, द्वेष आणि घृणेपोटी किंवा परिस्थितीमुळे गुन्हे घडत असतात. अशा गुन्हेगारांच्या आयुष्यात भगवद्गीतेच्या माध्यमातून सकारात्मकतेची जोड दिल्यास त्यांच्या आयुष्यात नवी पहाट निर्माण होऊ शकते. याचा प्रत्यय सध्या महाराष्ट्रातील कारागृहातून १९० बंदिजनांच्या साधनेतून दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून कारागृहात भगवद्गीतेच्या श्लोकांचे सूर घुमत आहेत. मागील वर्षभर गीता परिवाराच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्राच्या केंद्रीय कारागृहात भगवद्गीता संथा वर्ग सुरू आहेत.

स्वामी श्री गोविंद देवगिरीजी महाराजांनी स्थापन केलेल्या गीता परिवारातील स्वयंसेवक या उपक्रमामध्ये प्रशिक्षकाची भूमिका पार पाडत आहेत. गीता परिवारद्वारा आजतागायत १२ लाख साधकांना ऑनलाईन प्रशिक्षण दिले गेले आहे. पूर्णपणे निःशुल्क असे हे वर्ग १३ भाषांतून व २१'टाईम स्लॉट्स'मध्ये सोमवार ते शुक्रवार दररोज घेतले जात आहेत. हा वर्ग ४० मिनिटांचा आहे. वर्गामध्ये गीतेच्या श्लोकांचे शुद्ध उच्चारण शिकवले जाते. राज्यात या उपक्रमाचा व्यापक स्तरावर विस्तार करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या उपक्रमाच्या ऑनलाईन वर्गासाठी तांत्रिक बाबींची पूर्तता कारागृह प्रशासक आणि कर्मचारी करत आहेत. सर्वप्रथम छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात डिसेंबर २०२३ मध्ये पहिला वर्ग सुरू झाला. टप्प्याटप्प्याने यात कोल्हापूर, नाशिक, ठाणे, तळोजा येथील केंद्रीय कारागृहांना समाविष्ट केले गेले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात २५,ठाणे ३५,कोल्हापूर ४५,नाशिक ४०,तळोजा ३५,येरवडा १० कैद्यांचा समावेश आहे. या कारागृहातील सुमारे १९० बंदी साधक गीता श्लोक पठण करीत आहेत. प्रत्येक अध्यायाचे अर्थ विवेचन सुद्धा ऑनलाईन माध्यमातून केले जात आहे. सध्या ठाणे, नाशिक, कोल्हापूर आणि तळोजा येथील कारागृहांमध्ये तिसऱ्या टप्प्यांचे प्रशिक्षण पूर्ण होत आले आहे. येथे एकूण १२ अध्यायांचे प्रशिक्षण पूर्ण होत आहे. गीता परिवाराकडून सरळ पठणीय गीतेची पुस्तके साधकांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कारागृह अधिकारी आणि साधक या उपक्रमाबाबत समाधानी आहेत. याबरोबरच येरवडा महिला कारागृहामध्ये प्रत्यक्ष वर्ग घेण्यात आले. पुरुष बंदी बांधवांकरिता रविवारी उद्बोधनपर व्याख्याने घेतली जात आहेत.

शनिवारी व रविवारी शिकलेल्या श्लोकांचे विवेचन केले जाते. यावेळी उपस्थित साधकांच्या शंकांचे निरसन देखील केली जाते. गीता परिवाराचे हे वर्ग चार टप्प्यांमध्ये चालत आहेत. या चार टप्प्यातील वर्गांना चार स्तर म्हटले जाते. पहिल्या स्तरावर दोन अध्याय शिकवले जातात. दुसऱ्या स्तरामध्ये चार अध्याय शिकवले जातात. तिसऱ्या आणि चौथ्या स्तरमध्ये प्रत्येकी सहा अध्याय शिकवले जातात.या उपक्रमामुळे बंदीजनांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हा उपक्रम निश्चितच बंदीजनांना नव्या आयुष्याच्या वळणावर आणण्यास यशस्वी होत आहे. अशा उपक्रमांमुळे बंदीजन आपल्या कुटुंबात परत येवून एक चांगले आयुष्य जगू शकणार आहेत, असा विश्वास कारागृह प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# सातारा जिल्ह्याच्या उद्योगवाढीसाठी सर्वतोपरी प्रयत्नशील - उद्योग मंत्री सामंत

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय साताराचे लोकार्पण




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, सातारा :** सातारा जिल्ह्यात महामार्गाचे जाळे आहे. या ठिकाणी उद्योग व औद्योगिक वसाहतींच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येतील. सातारला आयटी पार्क व्हावा, अशी अनेक वर्षाची मागणी असून यासाठी सुचविण्यात आलेल्या जागा अत्यंत चांगल्या आहेत. साताराला निर्यातीची परंपरा मोठी असून ती अधिक वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातील. निर्यात पारितोषिक समारंभ सातारा येथे घेण्यात येईल यासाठी मासने समन्वयक म्हणून जबाबदारी घ्यावी. उद्योजकांचे प्रश्न सोडविण्यासाठी विभागस्तरावर उद्योग विभागाचा जनता दरबार घेण्यात येईल.

उद्योजकांचे प्रलंबित कामे, मागण्या, समस्या यांचा त्वरीत निपटारा करण्यात येईल, असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले.मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ सातारा (मास) यांच्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उद्याजकांशी संवाद मेळाव्याचे मास भवन येथील सर धनाजीशा कूपर सभागृहात आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी उद्योजकांशी संवाद साधला. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, उद्योजक फारोखजी कूपर, एमआयडीसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी पाटील, मुख्य अभियंता नितीन वनखंडे, विभागीय अधिकारी डॉ. अमितकुमार सोडगे, कार्यकारी अभियंता लिराप्पा नाईक, उप अभियंता लहु कसबे ,जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थाक उमेश दंडगव्हाळ, मासचे अध्यक्ष मानस मोहिते, धैर्यशील भोसले, बाळासाहेब खरात यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.सातारा येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी कार्यालय व्हावे, असे निर्देश तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते.

त्यानुसार सातारा येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी कार्यालयाचे उद्घाटन होत आहे याचा आनंद होत आहे, असे सांगून उद्योग मंत्री श्री. सामंत म्हणाले, या सुसज्ज कार्यालयाचे उद्घाटन करत असतांनाच या ठिकाणी काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कार्पोरेट पद्धतीने कामे केली पाहिजेत. उद्योजकांची कामे या कार्यालयाद्वारे सुलभ व त्वरीत झाली पाहिजेत. म्हसवड येथील नव्याने होत असलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये मोठं मोठे प्राजेक्ट येणार आहेत. यामध्ये डीफेन्स, फार्मा पार्क संबंधीत प्रोजेक्ट उभारण्याचे प्रयत्न केले जातील. फिल्म इंड्रस्टीलाही उद्योगाचा दर्जा देण्यात येणार असून त्यातून चांगली रोजगार निर्मिती होईल, असेही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यावेळी सांगितले. साताऱ्याला पर्यटन विकासाला अत्यंत मोठी संधी आहे, असे सांगून उद्योग मंत्री श्री. सामंत म्हणाले, त्या दृष्टीने उद्योग उभारणीसाठी प्रयत्न व्हावेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेमध्ये सातारा जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांनी जिल्ह्याचे विशेष अभिनंदन केले. राज्यात गेल्या तीन वर्षात साडेबत्तीस हजाराहून अधिक उद्योजक निर्माण करण्यात आले आहेत. या वर्षात २३ हजार नव उद्योजक नव्याने निर्माण केले जात आहेत. या माध्यमातून साधारणत: लाखाहून अधिक लोकांना रोजगार देण्यात आला आहे. त्यामुळे ही योजना अत्यंत महत्वपूर्ण आहे. या योजनेबरोबरच जिल्ह्यातील मंत्री महोदयांनी व लोकप्रतिनिधींनी विश्वकर्मा योजनेचा आढावा घेऊन या योजनेच्या अंमलबजावणीत ही जिल्हा अग्रक्रमावर आणावा.

या योजनेच्या माध्यमातून आपण असंख्य लघु उद्योजक निर्माण करु शकतो. कूपर उद्योग समूहाचे सीएमडी फारोखजी कूपर यांच्या दातृत्वाबद्दल त्यांचे आभार माणून साताऱ्यातील उद्योजकांचा समस्यांचा निपटारा केला जाईल. उद्योग वाढीला चालणा देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाहीही उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी दिली. सातारा जिल्ह्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी कार्यालय अनेक वर्षाचे उद्योजकांचे स्वप्न पूर्ण झाल्याबद्दल सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. भोसले तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्योग मंत्री उदय सामंत यांचे आभार मानले. सातारा जिल्ह्याला राष्ट्रीय महामार्गाच्या रुपाने चांगली कनेक्टिविटी असतांनाही सातारा एमआयडीसीची वाढ झालेली नाही ही फार मोठी सहल आमच्या सर्वांच्या मनात आहे. सातारा एमआयडीसी वाढ अत्यंत महत्वाची असून वर्णे, निगडी व जाधववाडी येथील भूसंपादनाचे नोटेफिकेशन झालेले आहे.

बागायती जमीन वगळून डोंगराकडची जमीन घेऊन एमआयडीसी वाढवावी. जिल्हाधिकारी यांच्या अधिकारामध्ये उपलब्ध असणारी जमिन यासाठी मिळविण्यात यावी व त्या ठिकाणी आयटी पार्क उभा करावा, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. भोसले यांनी केली. सातारा-पुणे हा प्रवास कालावधीत केवळ दोन तासांवर आला आहे. या मार्गावर दोन टनेलची कामे सुरु आहेत. ही टनेल कार्यान्वीत झाल्यानंतर हा कालावधी आणखीन कमी होईल. राष्ट्रीय महामार्गाची गरज सर्वात जास्त सातारा वासियांना आहे. हा मार्ग आमची लाईफलाईन आहे या महामार्गाच्या कामाच्या गुणवत्तेसाठी आम्ही आग्रही आहोत. नागेवाडी लिंब खिंड येथील ४६ हेक्टर जागा जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात असल्याने एमआयडीसीकडे हस्तांतरीत व्हावी यासाठी लवकरात लवकर प्रयत्न करावेत.

साताऱ्याला वीज, पाणी मुबलक आहे उद्योगाचे पाणी उपलब्ध आहे उद्योग वाढीसाठी पोषक वातावरण आहे. देशाबाहेरील अनेक उद्योजक महाराष्ट्रात येण्यासाठी सकारात्मक असतात त्यामुळे उद्योग वाढीत सातारा मागे राहू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. शासनाच्या सकारात्मक धोरणामुळे कूपर उद्योग समूह मोठा झालेला आहे. हा उद्योग समूह उत्पादित केलेला मालाची मोठ्या प्रमाणात निर्यात करीत असून उद्योग समूहात स्थानिकांनाच रोजगार दिला जात असल्याचे उद्योजक श्री. कूपर यांनी सांगितले.या कार्यक्रमापुर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी कार्यालयाच्या नुतनीकरण इमातीचे लोकार्पण उद्योग मंत्री श्री. सावंत व सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते झाले. मास भवन येथे प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत बोलतांना उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी एमआयडीसी वाढीसाठी भूसंपादन करताना सर्व लोकप्रतिनिधी आणि शेतकरी यांच्यासोबत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी चर्चा करावी. महसूल विभागाच्या अधिपत्याखालील जागा आयटी पार्कसाठी एमआयडीसीकडे मोफत हस्तांतरणाचा प्रस्ताव पाठवावा. ग्रामपंचायतीने एमआयडीसी परिसरातील दिवाबत्ती, पाणी रस्ते, स्वच्छता यांची कामे प्राधान्याने करावीत. माथाडी कायदा माथाडी कामगारांसाठी अत्यंत चांगला आहे. पण अमाथाडींचा उद्योजकांना कोणताही उपद्रव सहन केला जाणार नाही. संबंधित यंत्रणेने आवश्यक ती दक्षता घ्यावी. उद्योगांना प्रात्साहन अनुदान देण्याच्या योजनेतील थकीत रक्कम लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल.

नवीन औद्योगिक धोरण १५ दिवसात जाहीर करण्यात येईल. तसेच नव्याने सुरु करण्यात आलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारी कार्यालयाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही मंत्री श्री. सावंत यांनी सांगितले.या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, जयंत शिंदे, प्रांताधिकारी राहूल बारकुल, उज्वला गाडे, जिल्हा नियोजन अधिकारी शशिकांत माळी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते

# निंबोणी मरीआई चौक ते सलगर बु.रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १० कोटी मंजूर - आ.आवताडे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** मंगळवेढा तालुक्यातील निंबोणी मरीआई चौक ते सलगर बुद्रुक हा ९ किमी चा रस्ता अत्यंत खराब झाला होता. त्या रस्त्यावरून दळणवळण जास्त होते. मात्र खराब रस्त्यामुळे वाहतुकीस अडथळा येत होता. ही बाब लक्षात घेऊन आमदार समाधान आवताडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे पत्राद्वारे या रस्त्याला दुरुस्तीसाठी निधीची मागणी केली होती. त्या पत्राला अनुसरून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या रस्त्यासाठी १० कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी



दिली. मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागाला जोडणारा हा प्रमुख रस्ता असून या रस्त्यावरून तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व गावातून दळणवळण होत आहे. त्यामुळे हा रस्ता तात्काळ दुरुस्त होणे गरजेचे होते. त्यामुळे आमदार समाधान आवताडे यांनी तात्काळ या रस्त्यासाठी निधी देण्याची मागणी केली होती.

त्या मागणीची दखल घेत मंगळवेढा खोमनाळ भाळवणी निंबोणी सलगर बुद्रुक प्रजिमा ७३ अंतर्गत २० ते २९ किमी मध्ये सुधारणा करणे मध्ये शासनाकडून १० कोटी रुपये मंजूर झाला असून या कामाच्या निविदा काढून लवकरच काम सुरू करण्यात येईल असे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले. या कामसाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सहकार्य लाभले.

> मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व रस्त्याच्या अवस्था दयनीय झालेली होती. महायुतीचे सरकार आल्यापासून आमदार समाधान दादा आवताडे यांच्या मुळे रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाल्यामुळे आता येत्या काळात मतदार संघातील सर्व रस्त्याची कामे दर्जेदार होतील असा विश्वास व्यक्त आहे.
>
> **श्रीशैल्य धायगुंडे सलगर (बुद्रुक)**

# पारनेर तालुक्यात कांदा काढणीला वेग

## कांद्याचे बाजार पडल्याने कांदा काढून साठवून ठेवण्याशिवाय सध्या शेतकर्यांपुढे पर्याय नाही

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात उन्हाळी कांदा काढणी चालू झाली आहे. मजुरांचा तुटवडा भासू लागला आहे. मजूर उपलब्ध होत नसल्याने माळशेज घाटाखालून मजूर आणावे लागत आहेत. एका मजुराला साडेपाचशे ते ६०० रुपये रोज द्यावा लागत आहे. कांद्याचे बाजार पडल्याने कांदा काढून साठवून ठेवण्याशिवाय सध्या शेतकर्यांपुढे पर्याय राहिलेला नाही. यंदा पारनेर तालुक्यात ३ हजार हेक्टरवर कांद्याची लागवड करण्यात आली. साडेतीन - ४ महिन्यांत कांदा काढणीला येतो.



> सुमारे ३ एकर गावरान कांदा काढणीला आहे. कांद्याचे रोप, शेतीची मशागत, खुरपणी, औषधांची फवारणी, खते, मजुरी यासाठी सुमारे २ लाख रुपये खर्च झाला आहे. आजच्या बाजारभावाने विचार केला तर खर्चही वसूल होणार नाही.
>
> **- संदिप नाईकवाडी, शेतकरी, टाकळी ढोकेश्वर**

सध्या टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, ढवळपूरी, भाळवणी, कान्हुरपठार, वनकुटे, काकणेवाडी, खडकवडी वडगाव सावताळ या भागांमध्ये शेतकर्यांची कांदा काढण्याची लगबग सुरू आहे. मजुरांचा तुटवडा जाणवत असल्याने जादा मजुरी देऊन मजूर आणावे लागत आहेत. स्थानिक मजूर उपलब्ध होत नसल्याने माळशेज घाटाच्या खालून मजूर आळेफाट्यावर येत आहेत. कांदा काढण्यासाठी जो शेतकरी जास्त जास्त रोज देईल त्याकडे मजूर जात आहेत. यंदाच्या वर्षी कांद्याला पोषक वातावरण राहिल्याने कांद्याचे उत्पादनदेखील चांगले झाले आहे.

कांद्याच्या उत्पादनात जरी वाढ होत असली तरी बाजारभाव गडगडल्यामुळे शेतकर्याचे अर्थकारण कोलमडण्याची शक्यता आहे. सध्या चांगल्या गावठी कांद्याला १० ते १५ रुपये किलो असा भाव मिळत आहे. एक महिन्यांपूर्वी कांद्याला २० ते २५ रुपये किलो भाव होता. मात्र आता भाव कमी झाल्याचा फटका शेतकर्यांना बसत आहे.

# भटाळी गावाच्या पुनर्वसन प्रक्रियेला मिळणार गती; आ.मुनगंटीवारांनी व्यक्त केला निर्धार

## गावाच्या पुनर्वसन यासंदर्भात जिल्हा अधिकाऱ्यांसमवेत पाहणी दौरा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, चंद्रपूर :** भटाळी ओपन कास्ट माईन्समुळे भटाळी गावाला गंभीर समस्यांचा सामना करावा लागत आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी घटल्याने पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. खाणीत होणाऱ्या स्फोटांमुळे घरांना तडे गेले आहेत. तर शेती नष्ट झाल्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.

ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि स्थानिक समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासोबत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी भटाळी गावात पाहणी दौरा केला. गावाच्या पुनर्वसन प्रक्रियेला गती देण्याचा निर्धार केला असून, यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलण्यास कटिबद्ध असल्याची ग्वाही आ. मुनगंटीवार यांनी दिली. भटाळी गावाच्या पुनर्वसन यासंदर्भात चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या समवेत पाहणी दौरा दिनांक ०२ एप्रिल २०२५ केला. यावेळी उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अतुल जटाळे, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, पायली भटाळीचे सरपंच किसन उपरे, उपसरपंच विकास पेदांम, रामपाल सिंग, अनिता भोयर, सुरज पेदुलवार, राकेश गौरकार तसेच वेकोलीचे अधिकारी उपस्थित होते. आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, गाव पुनर्वसन समिती भटाळीच्या वतीने गावाच्या पुनर्वसनाबाबत नुकतीच बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीत पुनर्वसनाला होणारा उशीर लक्षात घेता, डब्ल्यूसीएलकडून कोळसा उत्खनन सुरू असतानाच गावाला धोका निर्माण होत असल्याने पुनर्वसन तातडीने व्हावे, अशी



मागणी भटाळीवासीयांकडून करण्यात आली.

यासाठी आमदार मुनगंटीवार यांनी सदर पुनर्वसन प्रक्रिया गतीने करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. पुनर्वसनाबाबत वेकोलीने सुचवलेली जागा गावकऱ्यांना मान्य नाही. यावर गावकऱ्यांसोबत बसून तोडगा काढण्यात येईल. पुनर्वसन स्थायी होण्याच्या दृष्टीने सर्वंकष अभ्यास करण्यात येईल. गाव पुनर्वसन समितीने गावाच्या पुनर्वसनाकरिता १३ मागण्या केल्या आहेत. येत्या ८ दिवसात या मागण्यांवर विस्तृत चर्चा करण्यात येईल. तसेच १३ मागण्यांचे विभाजन करून पुनर्वसन समिती समोर सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. भटाळी गावाच्या पुनर्वसनासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे तत्पर असून, लवकरात लवकर या प्रक्रियेला गती देण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील, असे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

# घरो घरी नर्सरी, घरो घरी वसुंधरा, घरो घरी माझी वसुंधरा तयार करण्याचे आयुक्त यांचे आवाहन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०४, मीरा भाईंदर :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने माझी वसुंधरा अभियान हे सुरू केलेले एक व्यापक उपक्रम आहे. जे निसर्गाच्या पाचही घटकांवर (पृथ्वी, पाणी, हवा, ऊर्जा आणि आकाश) लक्ष केंद्रित करते. ज्यामुळे पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता यावर भर दिला जातो. या वर्षी देखील महाराष्ट्र शासनाच्यावतीने माझी वसुंधरा ५.० अभियान राबवित आहे. त्यास अनूसरून या वर्षी देखील मिरा भाईंदर शहरात हा अभियान मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागामार्फत वसुंधरा महोत्सव २०२५ म्हणून साजरा करण्यात येत आहे. वसुंधरा महोत्सव २०२५ अंतर्गत दि.०४ एप्रिल २०२५ रोजीपासून ते दि.०६ एप्रिल २०२५ या दिवसात विविध उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

सदर महोत्सवाचा शुभारंभ आज दि.०४ एप्रिल २०२५ सायंकाळी स्व.बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक भाईंदर (पू.) येथे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी अति. आयुक्त डॉ.संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित, महानगरपालिकेच्या विविध विभागाचे विभागप्रमुख, माजी नगरसेवक/नगरसेविका, अधिकारी/कर्मचारी व शहरातील पर्यावरण स्नेही नागरिक उपस्थित होते. या महोत्सवाच्या पहिल्या दिवशी वृक्षाचे महत्व पटवून देण्यासाठी व शहरातील नागरिकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी सर्वप्रथम ढोल तशाच्या गजरात वृक्षदिंडी काढण्यात आली. त्यानंतर आयुक्त तथा प्रशासक यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करून दिप प्रज्वलन करन राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत पांडुरंगाला वंदन करून कार्यक्रमाच्या सूरूवातीस उपस्थित मान्यवर व नागरिकांनी एकत्रित हरीत वसुंधरेची शपथ घेतली. त्यानंतर शिव शंभो मर्दानी आखाडाच्या विद्यार्थिनींनी व विद्यार्थ्यांनी लाठीकाठी मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक दिले. उपायुक्त (मुख्यालय) श्रीम. कल्पिता पिंपळे यांनी उपस्थितांसमोर संपूर्ण महोत्सवाची प्रस्ताविका व रूपरेषा मांडली. त्यानंतर अति. आयुक्त डॉ.संभाजी पानपाट्टे यांनी मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना मिरा भाईंदर शहर ऐकल प्लास्टिक मुक्त करण्यासाठी योगदान करण्याचे व मिरा भाईंदर महापालिकेला सहकार्य करण्याचे आवाहन केले. पर्यावरण व संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील लोकधारेच्या आधारावर लोकनृत्य, सांस्कृतिक व कलात्मक कार्यक्रम सादर करण्यात आले. या सोबत पर्यावरणपूरक वस्तूंचे प्रदर्शन व विक्री केंद्र उभारण्यात आले आहे. या प्रदर्शनात व विक्री केंद्रांवर औषधी वनस्पती, बी-बियाणे रोपे, नर्सरी, आयुर्वेदिक व सौंदर्य उत्पादने, हस्तकला व हॅण्डलुम उत्पादने, विविध प्रकारचे अलंकार, खाद्यसंस्कृती, पर्यावरण संवर्धन प्रकल्प जसे की, सोलार सेल्स, सोलार बॅटरी, एत चार्जिंग पॉइंट्स, रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादी श्रेणीतील वस्तू उपलब्ध करण्यात आले. या विक्री केंद्रांना आयुक्त तथा प्रशासक व उपस्थित मान्यवर यांनी भेट दिले व त्यांचा आढावा घेऊन त्यांची माहिती घेतली. सदर विक्री केंद्रे शहरातील नागरिकांकरीता या ०३ दिवसाच्या महोत्सव कालावधीत सकाळी १० ते रात्री.१० दरम्यान खुले राहणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिनांक ०४, ०५ आणि ०६ एप्रिल २०२५ रोजी आयोजित केलेल्या वसुंधरा महोत्सवात शहरातील पर्यावरण स्नेही नागरिकांनी भेट द्यावी व पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगिकार करावा व मिरा भाईंदर शहरात घरो घरी नर्सरी, घरो घरी वसुंधरा, घरो घरी माझी वसुंधरा तयार करण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# थोडक्यात

## नेरुळ विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**अक्षराज : जे.के पोळ**



**दि.०४, नेरूळ (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊन ही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ.राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात निष्कासनाची कारवाई केली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागा अंतर्गत मे. विक्रम बार ॲण्ड रेस्टॉरेंट (विक्रम म्हात्रे) भुखंड क्र.३२५, सेक्टर- ६, नेरुळ, नवी मुंबई यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता विनापरवानगी भुखंड क्र.३२५ येथे तळमजल्यावर १०.००मी. द ८.००मी. १२.००मी. द २.३मी. या मोजमापाचे पत्राशेड बांधले आहे. तसेच टेरेसवर १२.००मी. द ७.५०मी. या मोजमापाचे पत्राशेड बांधले आहे व टेरेसवर टॉयलेटचे बांधकाम केले आहे व त्याचा वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अनधिकृत बांधकामधारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१अ) अन्वये दि.२४ एप्रिल २०१८ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही. सदर कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर, कनिष्ठ अभियंता संजय सोनटक्के व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, मजूर, व गॅसकटरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

## ओबीसी समाजाच्या मागण्या घेऊन केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष यांना दिले निवेदन


**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०३, चंद्रपूर :** केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांना राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या कार्यालय नई दिल्ली येथे दि.०३ एप्रिल २०२५ रोजी केंद्रीय पातळीवरच्या ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी निवेदन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.प्रा.बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात सादर करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर, राष्ट्रीय ओबीसी किसान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश साबळे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश भागरथ, वसंत भेर, रेल्वेचे माजी अधिकारी कापरे व इतर पदाधिकारी मंडळी उपस्थित होती. ओबीसी समाजाच्या मागण्यांमध्ये जातनिहाय जनगणना, केंद्रीय पातळीवर ओबीसींचे स्वतंत्र मंत्रालय, १३ सप्टेंबर २०१७ क्रिमिलियर ची मर्यादा वाढली नाही आहे ती वाढवणे, अजूनही केंद्रीय आणि राज्याच्या कार्यालयात ओबिसीचे २७ टक्के आरक्षण पूर्णपणे पदे भरल्या गेले नाहीत ते भरण्यात यावेत. ओबीसी समाजतील शेतकरी व शेतमजुरांना वयाच्या ६० वर्षानंतर पेन्शन योजना लागू करणे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांना संयुक्त भारतरत्न पुरस्कार देणे, मंडल आयोग, स्वामीनाथन आयोग लागू करणे, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षणाचा कायदा लागू करणे. ओबीसींसाठी लोकसभा व विधानसभा असे दोन स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करणे. अशा विविध ओबीसी समाजाच्या मागण्या केंद्रीय पातळीवर मंजूर करण्यासाठी महासंघातर्फे निवेदन सादर करण्यात आले.

## उदगीर तालुक्यातील ग्रामरोजगार सहायक संघटनेचे कामबंद आंदोलन सुरू

**अक्षराज : जयराम देमगुंडे**



ग्राम रोजगार सहाय्यक संघटना, उदगीर
ता. उदगीर जि. लातूर

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| चंद्रशेखर अनंतवाळ | विशाल गोजेगावे | मनोहर कसबे |
| मो.नं. 9373943077 | मो.नं. 9850151199 | मो.नं. 8007030231 |

जा.क्र. दि :01/04/2025

प्रति,
मा. गटविकास अधिकारी
पंचायत समिती, उदगीर

विषय :- ग्राम रोजगार सहाय्यकांचे गेल्या 6 महिन्यापासून मानधन न मिळाल्यामुळे काम बंद आंदोलन करणे बाबत.

मा. महोदय,
वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास सविनय विनंती करण्यात येते की, मागील महिन्यापासून ग्राम रोजगार सहाय्यकांचे मानधन न मिळाल्यामुळे उदगीर तालुक्यातील सर्व ग्राम रोजगार सहायक दिनांक 01/04/2025 पासून काम बंद आंदोलन करीत आहे. [illegible]

मा. महोदय आमच्या बिकट समस्यांचा सखोल विचार करून शासन दरबारी प्रश्न मांडावे आणि आम्हास उपकृत करावे ही विनंती.

प्रतिलिपी -
1) मा.ना. भरतजी गोगावले साहेब, रोजगार हमी मंत्री म.रा.
2) मा. श्री. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. लातूर
3) मा.श्री. तहसीलदार साहेब, तहसील कार्यालय, उदगीर

**दि.०३, उदगीर (लातूर) :** उदगीर मागील ६ महिन्यापासून ग्राम रोजगार सहाय्यकांना मानधन मिळत नसल्याने ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने कामबंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. संघटनेच्या वतीने दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उदगीर तालुक्यातील ग्रामपंचायतीत काम करीत असलेल्या ग्रामरोजगार कर्मचारी यांचे मागील ६ महिन्यापासून मानधन मिळाले नाही. शासनाने दि.०३ ऑक्टोबर २०२४ रोजी रोजगार सेवकांचा मानधन बाबतचा जीआर काढत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रोजगार सहाय्यक यांच्या मेळाव्यात बोलताना सांगितले होते की नो कमीटी ओन्ली डिबीटी, परंतु त्यानुसार रोजगार सेवकांच्या वैयक्तिक खात्यावर अजूनपर्यंत मानधन जमा केलेले नाही.

ग्रामीण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत हजारो मजुरांच्या हाताला काम देणारे रोजगार सेवक स्वतःच्या संसाराचा गाडा चालवण्यात असमर्थ ठरत आहे. मनरेगा सारखी योजना ग्रामरोजगार सेवकांनी प्रभावी अंमलबजावणी करुन प्रगतीपथावर आणली. मनरेगाचा मुख्य कणा असलेल्या ग्रामरोजगार सेवकांची सहनशीलता पूर्णपणे संपलेली आहे. रोजगार सेवक हा तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहे.

६ महिन्यांपासून मानधन नसल्याने त्याच्या कुटुंबियावर उपासमारीची वेळ आली आहे. रोजगार सेवकांचा विचार करुन लवकर शासनाने काढलेल्या शासन निर्णयाप्रमाणे मानधन जमा करावे, महागाई भत्ता देयक बाबत कार्यवाही, विमा संरक्षण देणे, मानधन वैयक्तिक खात्यात जमा करावे यासह अनेक मागणी केली आहे. या निवेदनाद्वारे करण्यात आलेल्या आहेत उदगीर तालुक्यातील सर्व रोजगार सहाय्यक उपस्थित होते.